दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा
बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०२६

# सृजनात्मक लिखानामधून उत्तम करियर घडू शकते

## • लेखक सुदर्शन खोत यांचे मत

जनप्रवास : कोल्हापूर

लेखक, दिग्दर्शक होण्यासाठी पैसा नाही तर कलात्मक विचार आणि बुद्धिमत्तेची गरज असते. सृजनात्मक लिखानामधून उत्तम करिअर घडू शकते, असे मत लेखक, दिग्दर्शक आणि अभिनेते सुदर्शन खोत यांनी व्यक्त केले.

विवेकानंद कॉलेजमधील वाङमय मंडळाच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर होते.

लेखक खोत म्हणाले, भाषेवर प्रभुत्व मिळवण्यासाठी भरपूर वाचन करा. सृजनात्मक लेखन करण्यासाठी सातत्य आणि चिकाटी अत्यंत महत्वाची आहे. अभिनय आणि साहित्यामध्ये करियर करायचे असेल तर विवेकानंद कॉलेज तुम्हाला उत्तम व्यासपीठ पुरवते. मी कॉलेजमध्ये असल्यापासूनच विवेक नियतकालिकेमध्ये लिहीत राहिलो. मला शाळेत असल्यापासूनच



विवेकानंद कॉलेजमधील कार्यक्रमात मार्गदर्शन करताना लेखक सुदर्शन खोत. सोबत प्राचार्य डॉ. एकनाथ आळवेकर व इतर.

अभिनय क्षेत्रात जायचे होते पण त्या इच्छेला मूर्त स्वरूप युथ फेस्टिवल मध्ये मिळाले. मला हवी असणारी संधी मला मिळाली. वाङमय मंडळाच्या समन्वयक डॉ. कविता तिवडे यांनी वाङमय मंडळातर्फे घेतल्या जाणाऱ्या कार्यक्रमांचा आढावा घेतला. त्यातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा साधला जातो ते स्पष्ट केले. राष्ट्रीय युवा साहित्य संमेलन, लेखकाशी भेट, सृजनात्मक लेखन कार्यशाळा अशा वर्षभरात घेतल्या जाणाऱ्या विविध उपक्रमात सहभागी होण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले.

अध्यक्षस्थानावरून प्रभारी प्राचार्य डॉ. एकनाथ आळवेकर म्हणाले, सृजनात्मक लिखाण करू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांनी सतत लिहीत राहणे आवश्यक आहे. आपले लिखाण जाणकारांकडून तपासून घेऊन त्यामध्ये सातत्याने सुधारणा करत राहणे देखील तितकेच गरजेचे आहे, असे विवेचन त्यांनी केले. सूत्रसंचालन हर्षपाली नामे आणि तनुजा घोरपडे यांनी केले. आभार डॉ. दीपक तुपे यांनी मानले. यावेळी डॉ. सुप्रिया पाटील, डॉ. स्नेहा देसाई, डॉ. आरिफ महात, प्रा. आतिश खांडेकर आदी उपस्थित होते.

दैनिक
हॅलो प्रभात

# सृजनात्मक लेखनातून उत्तम करिअर घडू शकते : सुदर्शन खोत

कोल्हापूर : हॅलो प्रभात

सृजनात्मक लेखनातून उत्तम करिअर घडू शकते. लेखक, दिग्दर्शक होण्यासाठी पैशापेक्षा कलात्मक विचार, बुद्धिमत्ता आणि भाषेवर प्रभुत्व आवश्यक आहे, असे मत सुप्रसिद्ध लेखक, दिग्दर्शक व अभिनेते सुदर्शन खोत यांनी व्यक्त केले. विवेकानंद कॉलेजच्या वाङ्मय मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. भरपूर वाचन, सातत्य आणि चिकाटीच्या जोरावर सृजनात्मक लेखनात यश मिळवता येते. अभिनय व साहित्य क्षेत्रात करिअर



करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विवेकानंद कॉलेज उत्तम व्यासपीठ आहे. आपण महाविद्यालयीन जीवनापासून 'विवेक' नियतकालिकात लिखाण केले असून, युवक महोत्सवातून अभिनयाची संधी मिळाल्याचे खोत यांनी सांगितले.

वाङ्मय मंडळाच्या समन्वयक डॉ. कविता तिवडे यांनी मंडळाच्या वर्षभरातील उपक्रमांची माहिती दिली. राष्ट्रीय युवा साहित्य संमेलन, लेखकांशी भेट व सृजनात्मक लेखन कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर होते. सृजनात्मक लेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी सातत्याने लिहित राहून जाणकारांकडून लिखाण तपासून घेत सुधारणा कराव्यात, असे त्यांनी सांगितले. हर्षपाली नामे व तनुजा घोरपडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दीपक तुपे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. सुप्रिया पाटील, डॉ. स्नेहा देसाई, डॉ. आरिफ महात, प्रा. आतिश खांडेकर यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.



26/08/2026